॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


**✲ सुविचार ✲**

चूक होणं स्वाभाविक आहे, पण ती सुधारणं शहाणपण आहे.


■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. २८ मे २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक ५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


## SPOT NEWS

### शरद पवार पुन्हा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

● **मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, यात काळजीचे कोणतेही कारण नसून, ते केवळ नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात गेले आहेत. शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही गंभीर बाब नाही. त्यांच्या नियमित चाचण्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना लवकरच रुग्णालयातून डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते, नेते आणि राज्यभरातील त्यांच्या चाहत्यांनी प्रकृतीबाबत कोणतीही चिंता करू नये, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यातदेखील शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शरद पवार दिल्लीहून आल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे उपचारासाठी त्यांना ॲडमिट करण्यात आले. दोन दिवसांत डिस्चार्ज मिळणार होता मात्र डॉक्टरांनी आराम करण्याचा सल्ला दिल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्येच ठेवण्यात आले होते. यावेळी देखील रुटीन चेकअपमुळे शरद पवारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### अर्थखाते पुन्हा राष्ट्रवादीकडे यावे; आमदारांची मागणी

● **मुंबई** – दिवंगत अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने राज्याचे राजकारण पार ढवळून निघाले. सत्तेत असलेल्या महायुतीसोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही अस्वस्थ झाला. अजित पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपदासह राज्याचे अर्थ विभाग सांभाळणे याचीही महत्त्वाची जबाबदारी होती. परंतु अजितदादा यांच्या अकाली निधनाने त्यांचे अर्थखाते हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्पुरते स्वत:कडे घेतले. तर अजित पवार यांच्या पत्नी, खासदार सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले. आता अजित पवार यांना जाऊन चार महिने पूर्ण होत आहेत. तेव्हा राष्ट्रवादीचे अर्थखाते पुन्हा पक्षाकडे यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी केली आहे. नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची एक बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच पक्षाचे सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित होते. यावेळी सुनील तटकरे, छगन भुजबळ, पार्थ पवार, जय पवार हेदेखील सहभागी झाले होते. यावेळी आमदारांनी अर्थखाते आता राष्ट्रवादी पक्षाकडे यायला हवे अशी मागणी केली. अजितदादांच्या निधनानंतर लगेचच राज्याचे अर्थ बजेट मांडले जाणार होते.

# ‘नाफेड-एनसीसीएफ’ १० लाख टन कांदा खरेदी करणार

## मंत्री अमित शहा । केंद्र-राज्य सरकार कांदा, ऊस, आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठिशी

● **मुंबई । वीरभूमी** – नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदी व्यापाऱ्याकडून नाही तर शेतकऱ्यांकडून करावी याला मान्यता मिळाली आहे. तसेच नाफेड व एनसीसीएफने २ लाख टनाऐवजी १० लाख टनाची खरेदी करावी याबाबत सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. तसेच एमएसपी वाढविणे, इथेनॉलचा कोटा वाढविणे, कर्ज पुनर्गठन करण्याबाबत सकारात्मक भूमिका केंद्रीय गृह तथा सहकारिता मंत्री अमित शहा यांनी घेतली आहे.

कांदा निर्यातीवर कोणतीही बंदी नसून ती घालण्यातही येणार नसल्याचेही शहांनी स्पष्ट केले आहे. तसेच आंबा उत्पादक शेतक-यांना मदत व्हावी यासाठी विमा कंपन्यांसोबत विम्याच्या अटीत बदल करण्यासाठी बैठकही घेण्याचे त्यांनी मान्य केले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. कांदा, ऊस, आंबा तसेच साखर कारखाने यांच्याशी संबंधित सर्वच प्रश्नांवर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून राज्य आणि केंद्र सरकार मिळून राज्यातील शेतक-यांच्या पाठिशी उभे असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राज्यात कांदा प्रश्न उग्र झाला आहे. आंबा-हापूस उत्पादक शेतकरी देखील अडचणीत आला आहे. कांदा, आंबा, ऊस, साखर कारखाने यांच्या प्रश्नांशी संबंधित बैठक नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. राज्य सरकारकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासोबत अनेक वरिष्ठ मंत्री उपस्थित होते. केंद्रीय गृह तथा सहकारिता मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय आपुर्ती मंत्री प्रल्हाद जोशी हे देखील उपस्थित होते. बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस माध्यमांशी बोलत होते.

नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदी सुरू केली आहे ती व्यापाऱ्याकडून न करता शेतकऱ्यांकडून केली पाहिजे या आमच्या मागणीला मान्यता मिळाली. नाफेड व एनसीसीएफने दोन लाख टना ऐवजी १० लाख टन कांदा खरेदी करावी अशीही आमची मागणी होती त्याबाबत सकारात्मक निर्णय होईल अशी आमची अपेक्षा आहे. विशेषत: आज कांद्याचे जे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होते त्यामुळे कांद्याला निर्यात मार्केट उरत नाही त्यावर एक्स्पोर्ट सरचार्ज लावावा ही आमची मागणी होती ती पण मान्य करण्यात आली आहे. कांदा साठवणूक आदीबाबतच्या मागण्याही मान्य करण्यात आल्या आहेत. कांदा खरेदीचा दर मंगळवारीच १५ रू ८० पैसे केला आहे. तो अजून वाढवावा अशीही मागणी आपण केली आहे. ग्रेडिंगमध्ये माल निकृष्ट दाखवून कांदा खरेदी नाकारण्यात येते. यावर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी स्पष्ट केले की आपण यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग करू. त्यामुळे जाणीवपूर्वक माल निकृष्ट सांगून नाकारतात त्यावर नियंत्रण येईल शेतकऱ्याला न्याय मिळेल असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

साखरेच्या प्रश्नावरही अतिशय सकारात्मक चर्चा झाली. एमएसपी वाढविण्यासंदर्भात, इथेनॉलचा कोटा वाढविण्याबाबत, डयुएल प्राईज सिस्टिम तयार करण्यासंदर्भात, कर्ज पुनर्गठन करण्याबाबत प्रत्येक गोष्टीत सकारात्मक निर्णय अमित शहांनी दिला असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. एमएसपी वाढविणे गरजेचे आहे हे मान्य केले. इथेनॉल कोटा मोठ्या प्रमाणात वाढविण्याबाबत दोन महिन्यात त्यासंदर्भातील निर्णय घेण्यात येणार आहे. डयुएल प्राईसिंग बाबत त्यांनी प्रस्ताव मागितला आम्ही तो देणार आहोत. तो मान्य झाल्यास साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटणार आहेत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### आंबा उत्पादकांचाही प्रश्न सुटणार

■ आंबा-हापूस आंबा उत्पादक यांच्या प्रश्नांबाबत एक निवेदन दिले. विमा कंपन्यांच्या अटीत बदल केला तर आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळू शकते हे त्यांच्या निदर्शनास आणले. त्याबाबत विमा कंपन्यांशी बैठक घेऊन त्यातून मार्ग काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यालाही न्याय देण्याचा प्रयत्न करतो आहोत असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## मुख्यमंत्री विजय यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

● **नवी दिल्ली । वीरभूमी** – तमिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री आणि तमिळगा वेत्री कळघम पक्षाचे संस्थापक-अध्यक्ष सी. जोसेफ विजय हे मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच दिल्लीत दाखल झाले आहेत. यावेळी मुख्यमंत्री विजय यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या सेवा तीर्थ या कार्यालयात भेट घेतली. पंतप्रधान कार्यालयाने या भेटीचे दोन्ही नेत्यांचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री विजय यांच्या भेटीचे फोटो समोर येताच त्याची चर्चा सुरु झाली. थलपती विजय हे अत्यंत साध्या वेशभूषेत म्हणजेच ब्लॅक ब्लेझर, व्हाईट शर्ट आणि ब्लॅक पॅन्ट अशा फॉर्मल लुकमध्ये पंतप्रधानांना भेटायला पोहोचले होते. त्यांनी पंतप्रधानांना फुलांचा बुके देऊन त्यांचे स्वागत केले. पंतप्रधान मोदींनीही यावेळी त्यांचे स्वागत केले. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे २५ मिनिटे चर्चा झाली. मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर विजय यांची ही पहिलीच अधिकृत भेट आहे.

औपचारिक संवादानंतर मुख्यमंत्री विजय यांनी तमिळनाडूच्या विकासासाठी आणि मागण्यांसाठी पंतप्रधान मोदींना एक सविस्तर निवेदन दिले. नेदरलँड्समधून अनाईमंगलम ताम्रपट परत आणण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या मदतीबद्दल मुख्यमंत्री विजय यांनी पंतप्रधान मोदींचे आभार मानले. तसेच तमिळनाडू सरकारच्या सर्व अधिकृत कार्यक्रमांची सुरुवात तमिळ थाई वझ्थु या राज्यगीताने करायला हवी अशी गृह मंत्रालयाकडे मागणी केली. तमिळनाडूमध्ये डीआरडीओचे 'सेंटर फॉर एअरबॉर्न सिस्टम्स' सुरु करण्याची विनंती यावेळी विजय यांनी केली. यावेळी विजय यांनीकर्नाटकच्या प्रस्तावित मेकेदातु धरण प्रकल्पावर त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. हा प्रकल्प कावेरी लवाद आणि सुप्रीम कोर्टाच्या आदेशांविरुद्ध असल्याचे सांगत, तमिळनाडू, केरळ आणि पुडुचेरीच्या संमतीशिवाय या प्रकल्पाला मंजुरी देऊ नये, अशी आग्रही मागणी केली.

## शेतकरी कर्जमाफीचा मार्ग मोकळा!

● **मुंबई । वीरभूमी** – राज्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडलेला आहे. आधी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर आता शेतमालाला भाव मिळत नाही. यामुळे शेतक-यांचे कंबरडे मोडले आहे. शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी माजी मंत्री बच्चू कडू यांनी आंदोलन केले होते. त्यावेळी राज्य सरकारने ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफ करण्याचा शब्द दिला होता. तथापि, विधान परिषदेच्या १७ जागांची निवडणूक सुरू आहे.

त्यामुळे आचारसंहितेचा फटका बसण्याची शक्यता वर्तवली होती. परंतु केंद्रीय निवडणूक आयोगाने यात सूट दिली आहे. त्यामुळे कर्जमाफीचा मार्ग मोकळा झाला असून, आता लवकरच ही प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे.

विधान परिषद निवडणुकीमुळे आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे कर्जमाफी संकटात सापडण्याची शक्यता होती. मात्र, केंद्रीय निवडणूक आयोगाने कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी आचारसंहितेतून विशेष सूट दिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात जाहीर केलेली ही कर्जमाफीची योजना आता ३० जूनपूर्वी अंमलात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सध्या या कर्जमाफीसाठीची पात्र शेतकऱ्यांची पडताळणी प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असल्याची माहिती आहे. आता ३० जूनपूर्वी कर्जमाफीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यानंतर अल्पावधित प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली जाणार असल्याची माहिती आहे.

काही महिन्यांपूर्वी सरकारने कर्जमाफीची घोषणा केली होती. याअंतर्गत नियमित कर्ज फेडणा-या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये दिले जाणार आहेत. तसेच आर्थिक अडचणीत सापडलेल्या आणि बँकेचे कर्ज थकलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची संपूर्ण कर्जमाफी केली जाणार आहे. ३० जूनपूर्वी शेतक-यांच्या खात्यावरील बोजा कमी होणार असून नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजारांची मदत थेट खात्यात जमा केली जाणार आहे.

# महानगरपालिका क्षेत्रात डिजिटल जनगणनेला वेग

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – भारत सरकारच्या गृहमंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेचे काम सध्या अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेगाने सुरू आहे. आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाला अधिक गती मिळाली असून प्रशासन, पर्यवेक्षक, प्रभाग अधिकारी व प्रगणक यांच्या समन्वयातून जनगणनेची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर पर्यवेक्षक व प्रभाग अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी मनपाच्या जनगणना कक्षात बैठक आयोजित करण्यात आली. जनगणना प्रक्रियेतील अचूकता, कामाचा वेग व डिजिटल प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नगेंद्र मुतकेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जनगणना ही देशाच्या नियोजनासाठी महत्त्वाची प्रक्रिया असल्याने प्रत्येक नोंदीची अचूकता व वेळेचे नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कामात अधिक समन्वय व कार्यक्षमता राखण्याच्या सूचना देत त्यांनी २३ मे ते १४ जून या कालावधीतील पुढील कामाचा आराखडाही सादर केला.

साहाय्यक आयुक्त मेहेर लहारे यांनी पूर्ण झालेली गणनाघरे, प्रणालीमध्ये अद्ययावत झालेली माहिती, एचएलओ ॲपमधील अडचणी व त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. क्षेत्रीय कामातील तांत्रिक बाबींवरही त्यांनी सूचना दिल्या.

डिजिटल प्रणाली अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे जनगणना विभाग प्रमुख राकेश कोतकर यांनी नमूद केले.

बैठकीत विविध पर्यवेक्षकांनी प्रत्यक्ष जनगणनेदरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणी तसेच नागरिकांशी संवादातील समस्या मांडल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रगणकांच्या कार्याचाही यावेळी गौरव करण्यात आला.



शहरातील सर्व प्रभागांतील पर्यवेक्षक व प्रभाग अधिकारी बैठकीस उपस्थित होते. डिजिटल जनगणना मोहिमेला प्रशासनाचे प्रभावी नियोजन व भक्कम पाठबळ मिळत असल्याचे या बैठकीतून स्पष्ट झाले.

# SPOT NEWS

## हरदिन मॉर्निंग ग्रुपची तत्परता; सापाला सुरक्षित पकडून निसर्गात मुक्त

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भिंगार येथील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकांमध्ये अचानक साप दिसल्याने काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी प्रसंगावधान राखत सापाला सुरक्षितपणे पकडून पुन्हा नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. या घटनेमुळे पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धनाबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला. भिंगार परिसरातील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये दररोजप्रमाणे हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य सकाळी व्यायाम, योगा आणि आरोग्यविषयक उपक्रमांसाठी एकत्र आले होते. याच दरम्यान पार्क परिसरात अचानक साप दिसून आला. साप दिसताच काही नागरिक आणि व्यायामासाठी आलेले सदस्य घाबरून गेले. काही काळ परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. मात्र, हरदिन ग्रुपचे सदस्य सुधीर कपाले यांनी धाडस आणि संयम दाखवत त्या सापाला कोणतीही इजा न होता सुरक्षितरीत्या पकडले. त्यांनी प्लास्टिकच्या बाटलीच्या साहाय्याने सापाला अलगद पकडून नियंत्रणात आणले. त्यानंतर ग्रुपच्या सदस्यांनी मिळून त्या सापाला जंगलमय आणि सुरक्षित नैसर्गिक परिसरात नेऊन पुन्हा मुक्त केले. या वेळी संजयजी सपकाळ, अशोकराव पराते, अविनाश जाधव यांच्यासह हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुप केवळ आरोग्य संवर्धनासाठी कार्य करत नाही, तर पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनालाही तितकेच महत्त्व देतो. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन यासोबतच पशु-पक्षी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठीही ग्रुपचे सदस्य नेहमी जागरूक असतात.

## निमगाव वाघा येथील रामकथेची भक्तिमय वातावरणात सांगता

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेचा नुकताच अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. सलग नऊ दिवस गावात श्रीराम नामाचा गजर घुमत होता. श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रामकथेला ग्रामस्थ आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गावातील श्री नवनाथ मंदिर परिसरात हा धार्मिक सोहळा रंगला होता. ह.भ.प. रामायणाचार्य संतोष महाराज कौठाळे (देवदैठण) यांनी आपल्या ओजस्वी वाणीतून रामायणातील विविध प्रसंगांचे प्रभावी निरूपण करत भाविकांना मंत्रमुग्ध केले. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, सत्य, कर्तव्य, त्याग, भक्ती आणि धर्म यांचे महत्त्व त्यांनी आपल्या प्रवचनातून विशद केले. रामायण हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवनाला योग्य दिशा देणारे संस्कारमूल्यांचे दीपस्तंभ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. रामकथेच्या प्रारंभी सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी संतोष महाराज कौठाळे यांचे स्वागत केले. यावेळी कथेचे आयोजक ह.भ.प. विठ्ठल महाराज फलके, नामदेव फलके, दत्तात्रय फलके, चंद्रकांत जाधव, पोपट भगत, अतुल फलके, छगन भगत, अशोक फलके, भाऊसाहेब ठाणगे, अरुण कापसे, किरण जाधव, सागर कापसे, बबन जाधव, जयराम जाधव यांच्यासह ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रामकथेचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांनी साकारलेले रामायणातील विविध जिवंत प्रसंग होते. बालकलाकारांनी प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण, हनुमान, रावण आदी पात्रांचे केलेले सादरीकरण पाहून उपस्थित भारावून गेले. विशेषतः रावण वधाचा प्रसंग आणि प्रभू श्रीरामांचे अयोध्येत आगमन यावेळी संपूर्ण मंदिर परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण गाव परिसर दणाणून निघाला. रामकथेच्या यशस्वी आयोजनासाठी श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि युवकांनी परिश्रम घेतले.

### पुणतांबा येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

# ऐतिहासिक घाटाच्या विकासासाठी निधी द्या

### आमदार आशुतोष काळे यांची पालकमंत्री ना. विखे पाटील यांच्याकडे मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी –**

धार्मिक, पौराणिक व ऐतिहासिक वारसा लाभलेले आणि दक्षिण काशी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांबा येथील गोदावरी नदीकाठावरील ऐतिहासिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाटाच्या संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी तातडीने निधी देण्याची मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



आमदार आशुतोष काळे यांनी निवेदनात पुढे असे नमूद केले आहे कि, पुणतांबा हे तीर्थक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असून गोदावरी नदीकाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला अहिल्या घाट हा या परिसराच्या वैभवाचा आणि अस्मितेचा ऐतिहासिक ठेवा आहे. हा घाट प्राचीन स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना मानला जात असून या घाटावर २६ भव्य दगडी पायऱ्या, आकर्षक गोलाकार बुरूज, प्राचीन महादेव मंदिर, कार्तिकस्वामी मंदिर आणि संत चांगदेव महाराज समाधी परिसर यांसारखी महत्त्वाची धार्मिक व पवित्र स्थळे आहेत. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशामुळे तसेच वर्षभरात अनेक विविध धार्मिक कार्यक्रम होत असल्याने राज्यभरातून हजारो भाविक, अभ्यासक आणि पर्यटक या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत असतात.

परंतु, काळाच्या ओघात आणि योग्य देखभालीअभावी सध्या या ऐतिहासिक घाटाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. घाटाचे जुने दगडी बांधकाम आता झिजत चालले असून अनेक ठिकाणी भिंतींना व पायऱ्यांना मोठे तडे गेले आहेत. घाटावर येणाऱ्या भाविक आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या संरक्षण भिंत आणि कठड्यांचा येथे मोठा अभाव जाणवतो आहे. याशिवाय घाटाच्या परिसरात स्वच्छता, रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय, ऐतिहासिक माहिती देणारे फलक आणि एकूणच सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीशी आणि लोककल्याणाच्या कार्याशी निगडित असलेल्या या ऐतिहासिक वास्तूचे मूळ वैभव टिकवणे आणि तिचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे.

गोदावरी नदी काठावरील या ऐतिहासिक अहिल्यादेवी होळकर घाटाचा कायापालट करण्यासाठी, इतिहास संवर्धनासाठी आणि भाविकांसह पर्यटकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी देण्याची मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली असून त्यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.

## श्रीगोंदा शहरासह पारगाव परिसरात अवैध दारू विक्रीवर बेलवंडी पोलिसांची धडक कारवाई



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर बेलवंडी पोलीस ठाण्याच्या पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण ६२ हजार ३४५ रुपये किमतीचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार बेलवंडी पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी पथकासह श्रीगोंदा शहर व पारगाव परिसरातील संशयित ठिकाणी छापेमारी केली.

यामध्ये पारगाव येथील हॉटेल दोस्ती येथे दत्तात्रय बाळू बोरुडे (रा. बोरुडेवाडी) याच्या ताब्यातून ३३ हजार ९२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच काष्टी रोडवरील हॉटेल संजोग येथे विशाल शामराव कळसकर याच्याकडून १ हजार ४०५ रुपयांचा दारूसाठा मिळून आला.

आढळगाव रोडवरील हॉटेल निसर्ग येथे विक्रांत संजय ससाणे (रा. गांधीनगर, बोलेगाव, ता. जि. नगर) यांच्या ताब्यातून १८ हजार ९४५ रुपयांचा तर हॉटेल वैष्णवी येथे अविनाश अशोक खवळे (रा. आवटेवाडी, ता. श्रीगोंदा) यांच्या ताब्यातून ८ हजार ११० रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला. या सर्व कारवाईत एकूण ६२ हजार ३४५ रुपये किमतीची देशी व विदेशी दारू जप्त करण्यात आली असून पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस हवालदार संदीप गवारे, पोलीस कॉन्स्टेबल राजू भोर, विनोद पवार तसेच होमगार्ड यांच्या पथकाने केली.

# पारनेर येथे बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता कमिटीची बैठक खेळीमेळीत

**● पारनेर । वीरभूमी–**

देशभरात गुरुवारी (दि. २८) मुस्लिम बांधवांचा पवित्र ‘बकरी ईद’ (ईद-उल-अजहा) सण मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणात साजरा केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच सर्वधर्मीयांमध्ये सामाजिक सलोखा कायम राहावा, यासाठी पारनेर पोलीस प्रशासनाच्या वतीने पारनेर पोलीस ठाण्यात शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले.



पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

पारनेर तालुक्याची सामाजिक आणि धार्मिक एकतेची परंपरा कायम राहिली आहे. यंदाही पारनेर शहर, टाकळी ढोकेश्वर, निघोज, सुपा, दरोडी, पिंपळगाव रोठा आदी प्रमुख गावांसह तालुक्यातील विविध भागांत मुस्लिम बांधव बकरी ईद साजरी करणार आहेत. सणादरम्यान कुठेही गालबोट लागू नये आणि उत्सव शांततेत पार पडावा, या उद्देशाने सर्वधर्मीय नागरिक व प्रमुख नेत्यांची उपस्थिती बैठकीत लक्षणीय होती.

यावेळी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या आगाऊ शुभेच्छा दिल्या. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे आणि सर्वधर्मसमभावाची भावना जपत सण साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीस तालुक्यातील विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यामध्ये युवा नेते अर्जुनशेठ भालेकर, पारनेर नगरपंचायतचे नगरसेवक योगेश मते, डॉ. बाळासाहेब कावरे, नगरसेवक भूषण शेलार, राजुशेठ शेख, डॉ. सादिक राजे, ड. तुषार औटी, राजू उबाळे, मच्छिंद्र नगरे आदींसह मुस्लिम बांधवांचा सहभाग होता.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून पारनेरमधील सर्वधर्मीय ऐक्य आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करण्याचा संदेश दिला. बैठकीला तालुक्यातील विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आणि शांततेत व उत्साहात सण साजरा करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीमुळे पारनेर तालुक्यातील सामाजिक सलोखा आणि शांततेचे वातावरण अधिक बळकट होण्यास मदत झाली आहे.

# म्हातार पिंपरीतील बारव संवर्धनादरम्यान २५० वर्षांपूर्वीचा शिलालेख सापडला

### मराठाकालीन जलव्यवस्था, ग्रामकारभार आणि सामाजिक रचनेवर नव्याने प्रकाश

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील म्हातार पिंपरी गावाच्या पूर्वेस असलेल्या पाझर तलावातील ऐतिहासिक बारव संवर्धन कार्यादरम्यान तब्बल अडीचशे वर्षांपूर्वीचा महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला आहे. या शोधामुळे श्रीगोंदा तालुक्यातील शिलालेखांची संख्या आता ४५ वर पोहोचली असून मराठाकालीन ग्रामीण प्रशासन, जलव्यवस्था आणि सामाजिक रचनेवर नव्याने प्रकाश पडला आहे.

ग्रामस्थांनी बारव स्वच्छता व संवर्धन कार्य सुरू केले असता पहिल्याच दिवशी नितीन वाबळे व ग्रामस्थांना पुष्करणीच्या पायऱ्यांजवळ हा शिलालेख दिसून आला. त्यानंतर राजेश इंगळे व सचिन भोसले यांनी शिलालेखाचे छायाचित्रण करून महाराष्ट्र बारव मोहीम व शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या सदस्यांना माहिती दिली.

पुण्यातील प्रसिद्ध शिलालेख अभ्यासक अनिल दुधाणे यांनी तातडीने शिलालेखाचे वाचन करून त्यातील ऐतिहासिक माहिती उजेडात आणली.

सदर शिलालेख हा देवनागरी लिपीतील मराठी भाषेतील असून पाच ओळींमध्ये कोरलेला आहे. लेखाच्या शेवटी नांगराची निशाणी कोरलेली असून ती तत्कालीन पाटीलकी व मुकादम पदाचे प्रतीक मानली जाते. अनेक वर्षे पाण्यात व उघड्यावर राहिल्याने काही अक्षरे झिजली असली तरी खडू छाप घेतल्यानंतर लेख स्पष्टपणे वाचण्यात यश आले.

शिलालेखानुसार शके १६९६, जय नाम संवत्सर, माघ शुद्ध सप्तमी अर्थात ७ फेब्रुवारी १७७५ रोजी दौलतराव, मुगटराव व मानाजीराव या वाबळे घराण्यातील व्यक्तींनी श्री भैरवनाथाच्या चरणी निष्ठा ठेवून लोककल्याणासाठी तीर्थ पुष्कर बारव बांधल्याची नोंद करण्यात आली आहे. या कार्याची नोंद सदाशिव व्यंकटेश कुलकर्णी यांनी केली असून त्यात पाटील, मुकादम व कुलकर्णी अशा मराठाकालीन प्रशासनातील पदांचाही उल्लेख आढळतो.

या शिलालेखाचे विशेष महत्त्व म्हणजे त्यामधून तत्कालीन गावकारभार, दफ्तरी भाषा, स्थानिक प्रतिष्ठित घराणी, धर्मकार्य आणि जलसंवर्धनाची परंपरा यांचा अभ्यास करण्यास मोठी मदत होणार आहे. वलद, ईबन यांसारख्या फारशी-अरबी प्रभावातील शब्दांचा वापर तत्कालीन प्रशासकीय भाषाशैलीचे दर्शन घडवतो.

इतिहास अभ्यासकांच्या मते, बारव ही केवळ पाण्याची रचना नसून ती सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे केंद्र होती. यात्रेकरू, ग्रामस्थ व प्रवाशांसाठी अशा पुष्करणींचे मोठे महत्त्व होते.



या शिलालेखामुळे म्हातार पिंपरी गावाच्या ऐतिहासिक वारशात आणखी भर पडली आहे. या शिलालेखाचा शोध व नोंदणी कार्यात संशोधक राजेश इंगळे, अनिल दुधाणे, डॉ. शैलेंद्र भांडारे, सचिन भोसले, नितीन वाबळे तसेच म्हातार पिंपरी ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

## SPOT NEWS

### शिंगवे तुकाईच्या शेतकऱ्यांचे एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

नेवासा तालुक्यातील पांढरी पूल येथील औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत अन्याय झाल्याचा आरोप करत शिंगवे तुकाई येथील शेतकऱ्यांनी बुधवारी (दि. २७ मे ) अहिल्यानगर येथील एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पांढरी पूल येथील शासकीय औद्योगिक वसाहतीसाठी शिंगवे तुकाई परिसरातील सुमारे १६० शेतकऱ्यांची २५४ हेक्टर पिकाऊ जमीन संपादित करण्यात आली होती. या ठिकाणी काही उद्योग सुरू झाले असले तरी जमीन संपादनावेळी शासन आणि अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात आलेली नाहीत. तसेच भूसंपादन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी शासनाकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. इतर प्रकल्पांप्रमाणे एकरी ५० लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांना पांढरी पूल एमआयडीसीमध्ये व्यवसायासाठी हेक्टर २५ गुंठे मोफत जागा उपलब्ध करून द्यावी, प्रकल्पग्रस्त दाखले तातडीने द्यावेत, तसेच प्रत्येक बाधित कुटुंबातील किमान एका सदस्याला कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय थकीत नुकसानभरपाई व्याजासह मिळावी, व्यवसायासाठी जागा न दिल्यास अतिरिक्त आर्थिक भरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय सेवेत आरक्षण मिळावे आणि शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण मोफत करण्यात यावे, अशाही मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत. या उपोषणात राजेश होंडे, पांडुरंग होंडे, म्हातारदेव पुंड, किसन होंडे, सुभाष दिघे, नामदेव कुऱ्हाड, दामोदर पुंड, आशिष ठोकळ, विमल आरु, शरद धइगे, रमेश आरु आदी शेतकरी सहभागी झाले आहेत.

### राष्ट्रवादी काँग्रेस श. प. पक्षाच्या महिला शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या अहिल्यानगर शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथील राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. खासदार निलेश लंके यांच्या शिफारशीवरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे तसेच महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्या उपस्थितीत निवडीची घोषणा करण्यात आली. अर्चना गायकवाड यांच्या निवडीमुळे पक्षाच्या महिला संघटनात्मक बांधणीला बळ मिळणार असल्याची भावना पक्ष पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविल्याचे सांगण्यात आले. यावेळी अर्चना गायकवाड यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. अहिल्यानगर शहरात महिलांसाठी विविध कौशल्यविकास कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महिलांसाठी मार्गदर्शन शिबिरे, स्वयंरोजगार आणि व्यवसायविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. युवतींसाठी नोकरी विषयक विशेष मार्गदर्शन, करिअर मेळावे आणि रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

# पारनेर ग्रामीण रुग्णालयाचा 'सावळा गोंधळ'!

## शवविच्छेदन साहित्याच्या नावाखाली पाच हजारांची मागणी । संतप्त नागरिकांचे ठिय्या आंदोलन

**● पारनेर । वीरभूमी –**

ऐन उमेदीतील तरुण मुलाच्या अकाली मृत्यूमुळे दुःखात बुडालेल्या कुटुंबीयांना पारनेर ग्रामीण रुग्णालयातील कथित गैरप्रकारामुळे आणखी मानसिक त्रास सहन करावा लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शवविच्छेदनासाठी लागणाऱ्या साहित्याच्या नावाखाली मृताच्या नातेवाईकांकडे पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप होत असून, या प्रकारामुळे संपूर्ण पारनेर तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे.




पारनेर शहरातील तेजस अनिल व्यवहारे (वय २०) या तरुणाने मंगळवारी (दि. २६) राहत्या घरी आत्महत्या करून जीवन संपवले. या दुर्दैवी घटनेमुळे शहरात शोककळा पसरली होती. कायदेशीर प्रक्रियेसाठी पोलिसांनी मृतदेह पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणला. मात्र, येथे संबंधित कर्मचाऱ्यांनी शवविच्छेदनासाठी लागणाऱ्या 'किट'चे कारण पुढे करत शोकाकुल नातेवाईकांकडे तब्बल पाच हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आधीच मुलाच्या निधनामुळे खचलेल्या कुटुंबाला या मागणीमुळे मोठा मानसिक धक्का बसला. एका बाजूला तरुण मुलाच्या मृत्यूचे अतीव दुःख आणि दुसऱ्या बाजूला शासकीय रुग्णालयातील ही क्रूर वसुली, हा माणुसकीचा अंत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नातेवाईकांकडून व्यक्त करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच पारनेरमधील लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. नगरसेवक तथा युवा नेते दिपक लंके, डॉ. बाळासाहेब कावरे, युवा नेते अर्जुन भालेकर, नगरसेवक योगेश मते, नगरसेवक भूषण शेलार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष वैभव गायकवाड, युवा नेते राजूशेठ शेख, मनसेचे सतीश म्हस्के, राहुल बुगे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी रुग्णालयात ठिय्या आंदोलन सुरू केले.

जोपर्यंत संबंधित मुख्य वैद्यकीय अधिकारी येथे येऊन जाब देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली.

त्यावेळी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश लोंढे रुग्णालयात हजर नव्हते. अखेर आंदोलकांनी त्यांच्याशी फोनवर संपर्क साधून रुग्णालय प्रशासनाच्या या अमानुष कारभाराचा पाढा वाचला. डॉ. लोंढे यांनी या प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी आणि सविस्तर चर्चेसाठी येत्या शुक्रवारची वेळ दिली. अधिकाऱ्यांच्या या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

परंतु, रुग्णालय प्रशासनाचा तीव्र निषेध करण्यासाठी आंदोलकांनी एक अनोखी आणि भावनिक चपराक लगावली. उपस्थित नागरिकांकडून ५-१० रुपये जमा करून (भीक मांगो आंदोलन) ते पैसे आणि डॉ. सतीश लोंढे यांच्या रिकाम्या खुर्चीला पुष्पहार अर्पण करून संपूर्ण ग्रामीण रुग्णालय प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला.आता सर्वांचे लक्ष प्रशासनाच्या कारवाईकडे लागले आहे. एका मृतदेहाच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या अशा लाचखोर कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई होणार का? की हा 'सावळा गोंधळ' असाच सुरू राहणार, असा संतप्त सवाल आता पारनेरकर विचारत आहेत.

### साम्रदचे सरपंच एकनाथ बांडे राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित



**● अकोले । वीरभूमी–**

साम्रद गावचे सरपंच एकनाथ भाऊ बांडे यांना नुकतेच राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळी भान यांच्या वतीने दरवर्षी समाजासाठी व गावासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

यावर्षी अकोले तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागातील साम्रद गावचे सरपंच एकनाथ भाऊ बांडे यांना त्यांच्या स्वच्छतेकडून समृद्धीकडे नेणाऱ्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला.

एकनाथ बांडे यांनी गावातील सर्व नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या चांगल्या कल्पनांचा स्वीकार करत त्या प्रत्यक्षात गावात राबविण्याचे काम केले. विविध विकास योजना प्रभावीपणे राबवून गावाला स्वच्छतेकडून समृद्धीकडे नेण्याचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी ठरला असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. पुरस्कार स्वीकारताना त्यांच्यासमवेत प्राचार्य दिलीप रोंगटे, शेंडी गावचे आदर्श माजी सरपंच दिलीपराव भांगरे, साम्रदचे माजी सरपंच चंदर बांडे, ग्रामसेवक श्री. मुंढे, नामदेव बांडे, मारुती बांडे, सोपान बांडे, राहुल बांडे, अतुल बांडे, सचिन शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

### हिंगणी दुमाला-निंबवी परिसरातील अवैध माती उत्खननावर महसूल विभागाची धडक कारवाई

**६० लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त । तिघांविरुद्ध गुन्हा दाखल**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

हिंगणी दुमाला व निंबवी परिसरात सुरू असलेल्या अवैध माती उत्खनन व वाहतुकीवर महसूल विभागाने मंगळवारी धडक कारवाई करत तब्बल ६० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ग्राममहसूल अधिकारी आकाश लहु ढोरमले यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. तहसीलदार सचिन डोंगरे यांना हिंगणी दुमाला व निंबवी परिसरात अवैधरित्या माती व मुरूम उत्खनन सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर महसूल विभागाच्या दोन पथकांनी मंगळवार, दि. २६ रोजी दुपारी कारवाई केली.

हिंगणी दुमाला ते गव्हाणवाडी रस्त्यावर कारवाईदरम्यान महसूल पथकाने दोन हायवा वाहने अडवली. त्यामध्ये एक वाहन क्रमांक एमएच-१६-डीपी-८०९९, तर दुसरे विनानंबरचे हायवा वाहन होते. चालकांकडे माती उत्खननाचा कोणताही वैध परवाना आढळून आला नाही. पंचनामा केल्यानंतर सुमारे ४० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, महसूल अधिकाऱ्यांनी पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले असता चालकांनी उद्धट वर्तन करत सरकारी कामात अडथळा आणला. तसेच वाहनांसह पळून जाण्याचा प्रयत्न केला. महसूल पथकाने अडविल्यानंतर चालक वाहनातून उड्या मारून फरार झाले.

त्यानंतर निंबवी परिसरात अपर तहसीलदार विनीत शिर्के यांच्या पथकाने आणखी एक हायवा ट्रक (एमएच-१६-एवाय-४८९४) पकडला. चालक किरण गावडे याच्याकडेही कोणताही परवाना आढळून आला नाही. त्यानेही सरकारी कारवाईला विरोध करून वाहन सोडून पळ काढला. या वाहनासह सुमारे २० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी नितीन राऊत (रा. सोनवडी, ता. दौंड, जि. पुणे), एमएच-१६-डीपी-८०९९ वरील अनोळखी चालक आणि किरण गावडे यांच्याविरुद्ध गौणखनिज चोरी, शासनाचा महसूल बुडवणे, पर्यावरणाचा ऱ्हास करणे तसेच सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# देवीभोयरे-वडझीरेसाठी वरदान ठरणारा शिवडोह कॅनॉल प्रकल्प लवकरच मार्गी

## सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार । जलसंपदा मंत्र्यांकडून तातडीने सर्व्हेचे आदेश

**● निघोज । वीरभूमी–**

पिंपळगाव जोगा धरणाच्या पाण्यापासून वंचित असलेल्या देवीभोयरे व वडझीरे गावांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारा शिवडोह कॅनॉल प्रकल्प लवकरच मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाण्याचा प्रश्न सुटण्याबरोबरच परिसरातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निकाली निघणार आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सर्व्हे करून काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मंगळवार, दि. २६ रोजी आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत आणि तालुक्याचे ज्येष्ठ नेते तथा अंबिका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंत्रालयात जाऊन विखे पाटील यांची भेट घेत या प्रकल्पाबाबत पाठपुरावा केला.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक विश्वनाथ गाजरे गुरुजी, माजी उपसरपंच विकास सावंत, सामाजिक कार्यकर्ते बाबुराव मुळे, श्रीराम पतसंस्थेचे उपाध्यक्ष गोपीचंद बेलोटे, माजी उपाध्यक्ष सुभाष बेलोटे, माजी उपसरपंच दत्तात्रय बेलोटे, अंबिका देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त बाबुराव बेलोटे, अक्षय बेलोटे, भाऊसाहेब सरडे, आजी-माजी सैनिक कल्याण संघटनेचे माजी अध्यक्ष कमलाकर बेलोटे यांच्यासह वडझीरे व देवीभोयरे परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या पंचवीस वर्षांपासून शिवडोह कॅनॉल प्रकल्पासाठी परिसरातील ग्रामस्थ व नेतेमंडळी प्रयत्नशील होते. यासंदर्भात ज्येष्ठ नेते शिवाजीराव जाधव यांनी आमदार काशिनाथ दाते आणि जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांच्याशी चर्चा करून पुढाकार घेतला. त्यानंतर गावकऱ्यांचे व पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ थेट मंत्रालयात घेऊन जात जलसंपदा मंत्र्यांकडे प्रकल्पाची मागणी मांडण्यात आली.

शिवडोह कॅनॉल प्रकल्पामुळे वडझीरे व देवीभोयरे परिसरातील सुमारे हजार ते अकराशे एकर शेतीला पाण्याचा लाभ होणार असून या प्रकल्पासाठी अंदाजे पाच ते सहा कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पाचा फायदा शेकडो शेतकरी कुटुंबांना होणार आहे.

सध्या या भागातील शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना अपेक्षित पिके घेता येत नाहीत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या परिसरातील पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात कमी होणार असून शेती विकासाला चालना मिळणार आहे.



जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून तातडीने सर्व्हे करून काम सुरू करण्याच्या सूचना दिल्याने हा प्रकल्प लवकर पूर्ण होईल, असा विश्वास ज्येष्ठ नेते शिवाजीराव जाधव यांनी व्यक्त केला. तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांचे त्यांनी आभार मानले.

सर्वसामान्य शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून या प्रकल्पामुळे देवीभोयरे व वडझीरे परिसरातील सुमारे दहा ते बारा गावांचा पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न सुटणार आहे, अशी माहिती शिवाजीराव जाधव यांनी दिली.

वीरभूमी

हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# लोणी व्यंकनाथमध्ये सामाजिक उपक्रमांनी मितेश नाहाटा यांचा वाढदिवस साजरा

## जागर युवा प्रतिष्ठानचे उद्घाटन; मंदिरासाठी २.२१ लाखांची देणगी, मोफत पाणीसेवा व शैक्षणिक मदतीची घोषणा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–** आजच्या दिखाऊ आणि खर्चिक वाढदिवसांच्या वातावरणात लोणी व्यंकनाथ येथे एका वाढदिवसाने समाजासमोर वेगळा आदर्श निर्माण केला. महाराष्ट्र राज्य जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा युवा नेतृत्व मितेशकुमार बाळासाहेब नाहाटा यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक आणि लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याच प्रसंगी जागर युवा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कमी वयात राज्यस्तरीय महामंडळामध्ये काम करण्याची संधी मिळाल्यानंतरही मितेश नाहाटा यांनी आपल्या जन्मभूमी लोणी व्यंकनाथ गावाशी कायम आत्मीयतेचे नाते जपले आहे. ग्रामदैवत हनुमान महाराज मंदिर विकास, गरजू रुग्ण व विद्यार्थ्यांना मदत, पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर उपाययोजना तसेच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविल्यामुळे ग्रामस्थांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना निर्माण झाली आहे.

वाढदिवसानिमित्त गावातील हनुमान मंदिर बांधकामासाठी नाहाटा परिवारातर्फे तब्बल २ लाख २१ हजार रुपयांची देणगी जाहीर करण्यात आली. तसेच ५००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टँकरचे लोकार्पण करून नागरिकांसाठी मोफत पाणीपुरवठा सेवा सुरू करण्यात आली. गावातील पाणीटंचाई लक्षात घेऊन करण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वागत केले.

दरम्यान, स्वर्गीय खंडू आप्पासाहेब काकडे यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवारावर आलेल्या संकटाच्या काळात लोणी व्यंकनाथ ग्रामपंचायतीने काकडे परिवारातील तिन्ही मुलांच्या शिक्षणासाठी ७५ हजार रुपयांची मदत जाहीर केली होती. दिलेला शब्द पूर्ण करत ही रक्कम श्रीमती शितल खंडू काकडे यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली. तसेच कु. वैष्णवी दत्तात्रय गोरखे हिच्या अकरावीपासून पुढील संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्यात आली. मारुती दत्तात्रय लबडे यांच्या शस्त्रक्रियेसाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त आयोजित मोफत डोळे तपासणी व चष्मा वाटप शिबिरालाही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे येथील नामांकित बुधराणी हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजित या शिबिरात सुमारे ३०० नागरिकांची तपासणी करून मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन दत्ता अण्णा खंडागळे यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमावेळी बोलताना मितेश नाहाटा भावुक झाले. गावामुळेच आज मी या स्थानापर्यंत पोहोचलो आहे. ग्रामपंचायतीपासून सुरू झालेला माझा प्रवास गावकऱ्यांच्या प्रेम, विश्वास आणि सहकार्यामुळेच शक्य झाला. त्यामुळे गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या सेवेसाठी सदैव कार्यरत राहणार, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. स्वर्गीय अजित पवार यांनी दिलेली सामाजिक बांधिलकीची शिकवणच पुढील वाटचालीची प्रेरणा असल्याचेही त्यांनी नमूद केले.



कार्यक्रमाचे उद्घाटक टिळक भोस यांनी स्व. अजित पवार आणि नाहाटा परिवाराच्या सामाजिक व राजकीय कार्याचा उल्लेख करत लोणी गावाच्या विकासातील योगदान अधोरेखित केले. स्व. अजित पवार आज आपल्या सोबत असते, तर लोणी व्यंकनाथ गाव विकासाच्या नकाशावर आणखी ठळकपणे झळकले असते, असे ते म्हणाले.

राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहाटा यांनी वाढदिवस म्हणजे समाजाला काहीतरी देण्याची संधी असल्याचे सांगत समाजहित आणि सेवा हीच आमची खरी भूमिका राहील, असे स्पष्ट केले.

या कार्यक्रमास राज्य बाजार समितीचे अध्यक्ष बाळासाहेब नाहाटा, टिळक भोस, जहीरभाई जकाते, भगवानराव गोरखे, खंडूशेठ काकडे, लालासाहेब शेख, विठ्ठल जठार, अण्णासाहेब मडके यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जागर युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, गरजूंना मदत आणि विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडलेला हा कार्यक्रम अनेकांच्या मनात समाजसेवेची प्रेरणा निर्माण करून गेला.

# विठ्ठल खर्चन मृत्यू प्रकरणातील दोषींवर सात दिवसात कारवाई करण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे

**● पाथर्डी । वीरभूमी–** दोन दिवसांपूर्वी पाथर्डी पोलिस स्टेशनच्या आवारात मयत झालेल्या विठ्ठल खर्चन यांच्या मृत्यूनंतर तालुक्यातील आंबेडकरी संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनाच्या आज दुसऱ्या दिवशी पोलिस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांशी सकारात्मक चर्चा करून तोडगा काढला. सदर घटनेची जिल्हा सहाय्यक पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे स्वतः तपास करणार आहेत. हा तपास सात दिवसात पूर्ण करुन प्राप्त अहवालानुसार कारवाई करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. दुपारी मयत विठ्ठल खर्चन यांचे शवविच्छेदन करण्यात आले त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर आखेगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



काल आंदोलनकर्त्यांनी पाथर्डी शहरात राष्ट्रीय महामार्गावरील मुख्य नाईक चौकात रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यासाठी सकाळीच तालुक्यासह जिल्ह्यातील विविध राजकीय पक्ष, संघटना, सामाजिक संघटनांचे अनेक कार्यकर्ते जमा झाले होते परंतु सकाळपासूनच शेवगावचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी आंदोलनकर्त्यांशी सकारात्मक चर्चा सुरू करून वरिष्ठांशी चर्चा झाली असून योग्य तो निर्णय घेतला जाईल असे आश्वासन कार्यकर्त्यांना देत हे रास्ता रोको आंदोलन स्थगित करण्याचे आवाहन केले. त्यामुळे कार्यकर्त्यांनी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या मांडला व जोरदार घोषणाबाजी सुरू केली. यानंतर पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, सहाय्यक पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, विभागिय पोलीस अधीक्षक निरज राजगुरू, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्यावर चर्चा करून सदर घटनेची सात दिवसांत सखोल व निष्पक्ष चौकशी केली जाईल व नंतर अहवालानुसार कारवाईचे लेखी आश्वासन दिले. यानंतर माध्यमांशी बोलताना प्रा किसन चव्हाण म्हणाले की, हे आंदोलन पोलिसांनी दिलेल्या आश्वासनावर तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. परंतु जर सात दिलसात योग्य ती कार्यवाही झाली नाही व मयतास व पिडितास न्याय मिळाला नाही तर मात्र मयत विठ्ठल खर्चन यांचा दशक्रिया विधी आम्ही पोलिस स्टेशनसमोर करु.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण, जामखेडचे ड अरुण जाधव, अंबादास आरोळे, बाबा राजगुरू, श्रीकांत बोर्डे, वसंत बोर्डे, नवनाथ चव्हाण अरविंद सोनटक्के, प्यारेलाल शेख, रोहिणी ठोंबे, आदिंसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. तर पोलिसांनी यावेळी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# आमच्या हक्काच्या निळवंडेच्या पाण्यावर डोळा ठेवणाऱ्यांनी फुकटचे श्रेय घेण्यासाठी आटापिटा करू नये : ज्ञानेश्वर गव्हाणे

**● कोपरगाव । वीरभूमी–** पाच वर्ष सत्ता असतांना कधीही जिरायती गावातील नागरीकांची आठवण आली तर नाहीच याउलट आमच्या हक्काच्या पाण्यावर डोळा ठेवून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. त्यामुळे तुम्हाला आमच्या भागातील नागरीकांनी गावात येण्यापासून देखील रोखले होते. याचा तुम्हाला जरी विसर पडला असला तरी आमच्या जिरायती भागातील नागरीकांना विसर पडलेला नाही. आज जिरायती भागात निळवंडे धरणाचे पाणी आले ते फक्त आणि फक्त आमदार आशुतोष काळे यांच्यामुळेच आलेले आहे. त्यामुळे आमच्या हक्काच्या पाण्यावर डोळा ठेवणाऱ्यांनी योगदान शून्य असतांना श्रेय घेण्यासाठी आटापिटा करू नये असा सल्ला अंजनापूरचे माजी सरपंच ज्ञानेश्वर गव्हाणे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून कोल्हे गटाला दिला आहे.

प्रसिद्धी पत्रकात सरपंच ज्ञानेश्वर गव्हाणे यांनी पुढे असे म्हटले आहे की, जोपर्यंत निळवंडे कालव्याचे पाणी उपलब्ध झाले नव्हते तोपर्यंत कोपरगाव तालुक्यातील जिरायती गावांना माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांनी स्वत: आर्थिक झळ सोसून उजनी उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित ठेवून जिरायती गावांना दुष्काळाच्या झळा जाणवू दिल्या नाही. मात्र २०१४ ते २०१९ या पाच वर्षात ज्यांच्याकडे तालुक्याची सत्ता होती त्यांनी कधी या योजनेकडे ढुंकून सुद्धा पाहिले तर नाहीच याउलट आमच्या हक्काच्या निळवंडेच्या पाण्यावरच त्यांनी डोळा ठेवला होता.



त्यामुळे आमचे हक्काचे पाणी वाचविण्यासाठी आम्ही २०१९ ला त्यांना घरी बसवून आमची काळजी करणारा आणि आमच्या वेदना जाणणारा नेता आमदार आशुतोष काळे यांच्या रूपाने निवडून दिला.

आमदार आशुतोष काळे यांनी देखील मतदार संघातील तमाम जनतेसह आमचाही विश्वास सार्थ ठरवून उजनी उपसा जलसिंचन योजना तर कार्यान्वित ठेवली. परंतु त्याच बरोबर निळवंडेचे पाणी जिरायती गावागावात कसे पोहोचविता येईल व त्यातून निळवंडे कालव्याच्या लाभक्षेत्रातील सर्व गावातील पाणी पुरवठा करणारे सर्व साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यासाठी वेळप्रसंगी कालव्याच्या भरावावर भर उन्हात ठाण मांडून बसलेले आ. आशुतोष काळे जिरायती गावातील नागरीकांनी पाहिलेले आहे. ज्या वेळी पाणी पोहोचविण्यासाठी अडचणी येतील त्या त्यावेळी स्वत:ची यंत्रणा उभी करून व सातत्याने जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून जिरायती गावातील सर्व बंधारे व पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरून देण्यासाठी त्यांचा आग्रह असतो. जिरायती गावातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचले हे आमदार आशुतोष काळेंच्या भगीरथ प्रयत्नांचे फलित आहे. त्यामुळे आमच्या काकडी, मल्हारवाडी, डांगेवाडी, मनेगाव, रांजणगाव देशमुख, वेस, सोयगाव, अंजनापूर, बहादरपूर, धोंडेवाडी, जवळके, शहापूर, बहादाराबाद या जिरायती गावातील मागील तीन पिढ्यांची निळवंडेच्या पाण्याची प्रतीक्षा आता कायमची संपली आहे.

नुकतीच टंचाई आढावा बैठकीत जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. यांच्याकडे सुरु असलेल्या आवर्तनातून कोपरगाव मतदार संघातील सर्व पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरून देण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दयाव्यात अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी केली होती. त्या मागणीला पालकमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देवून पाटबंधारे विभागाला सर्व पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरून देण्याच्या सूचना केल्यामुळे पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरण्याचे काम सुरु आहे मात्र अजून सर्व बंधारे भरलेले नाहीत. कारण शहापूर बंधाऱ्यात पाणी येणे बाकी आहे व बहादराबादच्या केटीवेअरमध्ये अजून पाणी पडायचे आहे आणि वेस व अंजनापूर बंधाऱ्यामध्ये नुकतेच पाणी सुरु झाले आहे. बहादरपूरमध्ये पाणी आले असले तरी अजून बंधारे भरलेले नाही. मात्र याची माहिती न घेता केवळ फुकटचे श्रेय घेण्यासाठी कोल्हे गटाच्या कार्यकर्त्यांनी योगदान शून्य असलेल्या नेत्याचे फुकटचे कौतुक करणे हास्यास्पद आहेच परंतु त्यापेक्षा नेत्याने योगदान नसतांना आपली पाठ थोपटून घेणे हे त्यापेक्षा जास्त हास्यास्पद आहे. उतावळा नवरा अन गुडघ्याला बाशिंग असं करू नका कारण ए पब्लिक है, और समझदारभी है, ए सब जानती है असा टोला सरपंच ज्ञानेश्वर गव्हाणे यांनी शेवटी लगावला आहे.

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धेचा पटावर चाल देऊन शुभारंभ

## आमचा उद्देश फक्त स्पर्धा घेणे नसून खेळाडू घडवणे आहे : नरेंद्र फिरोदिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी–** शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव आणि अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित या स्पर्धेला देशभरातील बुद्धिबळपटू, पालक आणि बुद्धिबळप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली होती. या स्पर्धेत देशाच्या विविध राज्यातून २७५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी आहेत. या स्पर्धेत १४० आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी आहेत.यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारूनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी आदी उपस्थित होते.

स्पर्धेबाबत माहिती देताना अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, देशभरातील नामांकित बुद्धिबळपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील पेक्षा २७० अधिक खेळाडूंनी सहभाग निश्चित केला आहे. अवघ्या साडेपाच वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ९२ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असुन ते पुढे म्हणाले, अहिल्यानगरमध्ये प्रथमच इतक्या मोठ्या स्तरावरील फिडे रेटिंग स्पर्धा होत आहे. बुद्धिबळाचा प्रसार आणि प्रचार वाढवण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून शंभर चेस बोर्ड खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आमचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून उत्कृष्ट खेळाडू घडवणे हा आहे. यंदा रशियन ग्रँड मास्टर यांना बोलावून विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा खेळाडूंना मोठा फायदा होणार असल्याची भावना व्यक्त केली तर संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविक केले.



या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे, पवन राठी, शिरीष इंदुरकर, शार्दुल तपासे, अमरीश जोशी, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धंगेकर, विशाल गुजराती काम पाहणार आहेत.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे खजिनदार सुबोध ठोंबरे, सदस्य पारूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, विशाल गुजराती संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, रोहिणी आडकर, दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदी परिश्रम घेत आहेत. सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे सर यांनी केले तर आभार खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी मानले.